|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

***Affiliation*** (संलग्नता विभाग)

जा.क्र. कबचौउमवि /५/संलग्नता/२२६ /२०२० दि. २८.०८.२०२०

**महत्वाचे**

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक...**

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता **संलग्नीकरणाचे नुतनीकरण/तुकडी नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार,** तसेच **कायम संलग्नीकरण** इत्यादिंचे प्रस्ताव/अर्ज सादर करण्यासाठी कालावधी वाढवून देणेबाबत..

**संदर्भ :-** ०१) जा.क्र.कबचौउमवि/५/संलग्नीत महा.प्रस्ताव-२०२१-२२/१८६/२०२० दि. ३०/०७/२०२० चे परिपत्रक
०२) जा.क्र. कबचौउमवि /५/संलग्नता/२०७ /२०२० दि. १७.०८.२०२० चे पत्र

**महोदय/महोदया,**

विद्यापीठाच्या वरील संदर्भिय क्र. १ परिपत्रकाचे अवलोकन व्हावे. सदर परिपत्रकानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता संलग्नीकरणाचे नुतनीकरण/तुकडी नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार तसेच कायम संलग्नीकरण इ. प्रस्ताव मागविण्यात आलेले आहेत.

सदर परिपत्रकातील मुद्दा क्र. ८ नुसार महाविद्यालयांनी संलग्नीकरणाचे नुतनीकरण ऑनलाईन माहिती/ अर्ज हार्डकॉपीसह फाईल्स जमा करण्यासाठी कालावधी देण्यात आलेला आहे. त्यानंतर संदर्भिय क्र. २ च्या पत्रानुसार महाविद्यालये/परिसंस्थांनी त्यांचे प्रतिनिधी यांना कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता, खबरदारीचा उपाय म्हणून प्रस्ताव सादर करण्यासाठी विद्यापीठात पाठवू नये असे देखील कळविण्यात आलेले आहे.

तथापि, दि. १४/०८/२०२० ते २६/०८/२०२० या कालावधीत काही तांत्रिक व अपरिहार्य कारणामुळे OAASIS Portal कार्यान्वित नसल्यामुळे काही महाविद्यालयांना ऑनलाईन माहिती भरता आलेली नाही. त्यामुळे महाविद्यालयांकडून/परिसंस्थांकडून ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी अशी मौखिक विनंती विद्यापीठास करण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता प्राप्त आदेशान्वये कळविण्यात येते की, संलग्नीकरणाचे नुतनीकरण व नैसर्गिक विस्तारांचे ऑनलाईन प्रस्ताव सदर करण्यासाठी दि. ०१/०९/२०२० ते ०५/०९/२०२० पर्यंत कालावधी वाढवून देण्यात येत असून, दि. ०५/०९/२०२० नंतर कोणत्याही कारणास्तव ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यासाठी कालावधी वाढवून दिला जाणार नाही. विहीत मुदतीत संबंधित महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी प्रस्ताव सादर न केल्यास अध्यादेश १७२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यासाठी वरीप्रमाणे मुदत वाढवून देण्यात आलेली असली तरी प्रस्तावा सोबतच्या शुल्काचा धनाकर्ष (Demand Draft) हा दि. ३१ ऑगष्ट, २०२० या तारखेपर्यंत काढलेला असणे बंधनकारक आहे.

याव्यतिरीक्त प्रस्ताव सादर करणेबाबतच्या सूचना संदर्भिय परिपत्रक क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे यथास्थिती लागू आहेत, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता, प्रस्ताव विद्यापीठात जमा करण्याबाबत आपणास यथावकाश कळविण्यात येईल. त्याप्रमाणे सुधारित वेळापत्रक निर्गमित करण्यात येईल. त्यामुळे कृपया विद्यापीठात प्रतिनिधी पाठवू नये.

आपला विश्वासू,

सहा.कुलसचिव
(संलग्नता विभाग)

**प्रत माहितीसाठी:-**

०१) मा.कुलगुरु कार्यालय , कबचौउमवि, जळगाव ०२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव ०३) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

Scanned by CamScanner